जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- २८० दिनांक :- ०४/१०/२०२१

# ११२६ ग्रॅम वजनाचा केटामाईन व १३ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन असा एकुण १०,५६,००० रुपये किंमतीचा अंमली पदार्थ बाळगणा-या ३ नायजेरीयन ईसमांवर-अंमली पदार्थ विरोधी कक्ष, यांची कारवाई.

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना दिनांक ०२/१०/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, नायगांव (पुर्व), डॉन बॉस्को स्कुल जवळील साई दर्शन बिल्डींग मध्ये राहणारे परकीय नायजेरीयन नागरीक हे अंमली पदार्थ विक्रीकरीता घेवून आलेले आहेत.

सदर मिळालेल्या बातमीचा आशय वरिष्ठांना कळवुन डॉ. श्री महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे परवानगीने व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करण्यात आल. सदर कारवाईचे दरम्यान नायगांव (पुर्व), डॉन बॉस्को स्कुल जवळील साई दर्शन बिल्डींग मधील ए विंग, रुम.क्र.४०३ मध्ये राहणारे १) ओशीता डोझी चिबुझी वय ३६ वर्षे, मुळ रा.३७, अकोझु स्ट्रीट, अनाब्रा स्टेट, देश-नायजेरीया २) ईझे इकेने वय २९ वर्षे, रा. मुळ रा. ईमो स्टेट नं.०१, ओष्टा चुक्स, देश-नायजेरीया ३) ईबुका किंग्सले अच्युनिलो वय ३२ वर्षे, रा. मुळ रा. ईमो स्टेट, ईस्ट नायजेरीया यांचे कब्जात एकुण ११२६ ग्रॅम वजनाचा केटामाईन नावाचा व १३ ग्रॅम वजनाचा मॅफेड्रॉन नावाचा एकुण १०,५६,०००/-रु. किंमतीचा अंमली पदार्थ मिळुन आला. सदरचे अंमली पदार्थ केटामाईन व मॅफेड्रॉन जप्त करण्यात आलेले असुन नमुद नायजेरीयन आरोपींविरुध्द अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क) २२ (क) २९ नुसार वालीव पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. ा ११२४/२०२१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयात तीन आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास वालीव पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

सदरची कारवाई श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांचे परवागीने व श्री. रामचंद्र देशमुख सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, सपोनि. श्री. विलास कुटे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेम-भरोसा सेल, पो.हवा. धनाजी इंगळे, पो.ना.पवन पाटील, पो.शि. चव्हाण, अजय यादव, विष्णुदेव घरबुडे, मपोशि/ १४३ जाधव, पोना/विनोद राऊत, पो.ना.१६१०/शिवाजी पाटील, पो.ना.१०३१/राजाराम काळे नेमणुक-मध्यवर्ती गुन्हे शाखा, पो.ना.१२८१/ रोशन किणी, मपोहवा.१३८४/डोईफोडे नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा विभाग यांनी केली आहे.

---000--